**मंगळवार, दिनांक २९ एप्रिल, २०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता मंत्रालय, मुंबई येथील ७ व्या मजल्यावरील मंत्रिमंडळ सभागृहात झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीच्या कार्यवृत्तातील आपल्या विभागाशी संबंधित निर्णयाचा उतारा :-**

गुप्त

मुख्य सचिवांचे कार्यालय,
सामान्य प्रशासन विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : **०८ मे, २०२५.**

शासनाचे अपर मुख्य सचिव (जलसंपदा) / अपर मुख्य सचिव (पाणी पुरवठा व स्वच्छता) / अपर मुख्य सचिव (परिवहन व बंदरे) / अपर मुख्य सचिव (सार्वजनिक बांधकाम) / प्रधान सचिव (कृषि) / प्रधान सचिव (इतर मागास बहुजन कल्याण) / सचिव (महिला व बाल विकास) यांना महाराष्ट्र शासन कार्यनियमावलीच्या नियम १५ अन्वये देण्यात आलेल्या शासनाच्या कामकाजासंबंधी अनुदेशामधील अनुदेश २७ (३) अन्वये योग्य कार्यवाहीसाठी पाठविण्यात येत आहे.

विभागाने सदर निर्णयाची **अंमलबजावणी तातडीने** करावी व तत्संबंधीची माहिती मंत्रिमंडळास देण्याकरिता विहित केलेल्या प्रपत्रात ई-समिक्षा प्रणालीवर सादर करावी. यामध्ये कोणतीही अडचण असल्यास प्रकरण शासनास त्वरित फेरसादर करावे.

उ. स. (व.मो.)

मंत्रिमंडळ सचिव

प्रत (संपूर्ण कार्यवृत्ताच्या प्रतीसह) :-

१) अपर मुख्य सचिव (वित्त)
२) अपर मुख्य सचिव (नियोजन)

३०/५/२५

**मंत्रिमंडळ बैठकीचा दिनांक : २९.०४.२०२५**

**विषय क्रमांक ८ :** **सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन यांचेमार्फत महा इनविट (पायाभूत सुविधा गुंतवणुक संस्था) Maha InvIT (Infrastructure Investment Trust) स्थापन करण्यास मान्यता मिळण्याबाबत.**

या विषयावरील विभागाने सादर केलेल्या प्रस्तावावर मंत्रिमंडळाने चर्चा केली आणि खालीलप्रमाणे निर्णय घेतले.

१. सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत महा इनविट स्थापन करण्यास तत्त्वत: मान्यता प्रदान करण्यात यावी.

२. महा इनविट करीता विशेष प्रयोजन संस्था (Special Purpose Vehicle - SPV) स्थापन करण्यास तत्वत: मान्यता प्रदान करण्यात यावी.

३. महा इनविट करीता सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन प्रायोजक आहे. महा इनविट करीता Indian Trusts Act, १८८२ अंतर्गत Trust गठीत करण्यास तत्वत: मान्यता प्रदान करण्यात यावी.

४. महा इनविट ची रचना, अंमलबजावणी व नोंदणी SEBI (Infrastructure Investment Trusts) Regulations, २०१४ नियमानुसार करण्यास तत्वत: मान्यता प्रदान करण्यात यावी.

५. मंत्रिमंडळाच्या पूर्व मान्यतेनंतर सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत विभागाचे, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ व महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ यांचेकडील निवडक पायाभूत सुविधा प्रकल्पांचा महा इनविट मध्ये हस्तांतरीत करण्यास व खाजगी/सार्वजनिक गुंतवणूकदारांकडून निधी संकलनाची प्रक्रिया सुरू करण्यास तत्त्वत: मान्यता प्रदान करण्यात यावी.

**कार्यवाही : अपर मुख्य सचिव (सार्वजनिक बांधकाम)**

( विठ्ठल भास्कर )
अवर सचिव
मुख्य सचिव कार्यालय
सामान्य प्रशासन विभाग
महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२